# कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
## (म्हाडाचा प्रादेशिक घटक)

म्हाडा
MHADA

## म्हाडाची गृहनिर्माण योजना-२०१६

**म्हाडाच्या सदनिकांच्या विक्रीसाठी कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनिमय, १९८१ आणि म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ यांमधील तरतुदींनुसार, ४२७५ सदनिकांच्या विक्रीची जाहिरात कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळातर्फे घोषीत करण्यात येत आहे.**

### अर्जदारांची नोंदणी, ऑनलाईन अर्ज भरणे व स्विकृतीचे वेळापत्रक

**१) अर्जदारांची नोंदणी दिनांक १३/०१/२०१६ दुपारी २.०० वा. पासून ते ०७/०२/२०१६ सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत २) नोंदणीकृत अर्जदारांसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याचा दिनांक १५/०१/२०१६ दुपारी २.०० ते दि. ०९/०२/२०१६ सायंकाळी ६.०० पर्यंत**
**३) बँकेत अर्ज व डी.डी. स्विकृती दिनांक १५/०१/२०१६ ते दि. ११/०२/२०१६ (बँकेच्या कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत) (अनामत रक्कम ऑनलाईन न भरणाऱ्यांसाठी)**

### ऑनलाईन अर्जापोटी रु. ३००/- (विना परतावा)

| अनु क्र. | योजनेचा संकेत क्रमांक | योजनेचे नाव | उत्पन्न गट | विक्रीसाठी उपलब्ध एकूण सदनिका | सदनिकेचे जोते क्षेत्रफळ (चौ.मीटर) (builtup area in sq. mt.) | सदनिकेचे चटई क्षेत्रफळ (चौ.मीटर) (carpet area in sq. mt.) | सदनिकेची अंदाजित विक्री किंमत | अर्जासोबत भरावयाची अनामत रक्कम + अर्ज शुल्क रु. ३००/- | आरक्षण गटनिहाय उपलब्ध सदनिका | | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | अनुसूचित जाती आणि नवबौध्द | अनुसूचित जमाती | भटक्या जमाती | विमुक्त जमाती | पत्रकार | स्वातंत्र्य सैनिक | अंध व शारिरिक दृष्ट्या अपंग | सरंक्षण दल किंवा सीमा सुरक्षा दलातील लढाईत मृत झालेल्या व्यक्तीचे कुटुंबीय अथवा लढाईत जखमी होऊन अपंग झालेले कर्मचारी | माजी सैनिक व त्यांच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्ती | महाराष्ट्रातील मतदार संघाचे प्रतिनिधीत्व करणारे संसदेचे विधानसभेचे व विधानपरिषदेचे आजी-माजी सदस्य | म्हाडा कर्मचारी (ज्यांची सेवा ५ वर्षे पूर्ण झाली आहे असे.) | राज्य शासकीय कर्मचारी आणि संबंधित मंडळ, महामंडळे इ. चे कर्मचारी (ज्यांची सेवा ५ वर्षे पूर्ण झाली आहे. यात यापूर्वी सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचा समावेश आहे) | शासकीय निवासस्थानामध्ये रहाणारे आणि जे तीन वर्षात सेवानिवृत्त होणार आहेत किंवा अगोदरच सेवानिवृत्त झाले असतील असे केंद्र सरकारचे कर्मचारी | चिटपट, दूरदर्शन, नाटक, तमाशा, आकाशवाणी या माध्यमातील कलाकार तसेच परफार्मींग आर्टसशी संबंधित असलेले कलाकार (यामध्ये चित्रकार, शिल्पकार, गवई (गायन व वाद्य) नर्तक, कारागीर, कवी, कव्वाल व नकलाकार यांचा समावेश आहे.) | सर्वसाधारण जनता | शासन स्वेच्छा निर्णया खालील आरक्षण | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ |
| बांधकाम पूर्ण झालेल्या सदनिका (जशा आहेत तशा स्थितीमध्ये) | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | १३०-डी | बाळकूम, ठाणे | अत्यल्प उत्पन्न गट | १० | ३३.१३ | २५.०५ | ५५८२१३ | ५३००/- | ६ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १० |
| २ | १३१-डी | बाळकूम, ठाणे | अत्यल्प उत्पन्न गट | ४ | २५.८३ | १९.२६ | ४३७४१८ | ५३००/- | १ | १ | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ३ | १३२-ए | बाळकूम, ठाणे | अत्यल्प उत्पन्न गट | ५ | २३.०४ | १८.१२ | ४३२६०६ | ५३००/- | १ | ० | ० | ० | १ | १ | ० | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ० | ० | ५ |
| ४ | २५४-बी | मीरा रोड बिल्डिंग नं. ई-७ | अत्यल्प उत्पन्न गट | ३० | २८.५४ | २१.०० | १२१२४७८ | ५३००/- | ५ | १४ | २ | ४ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ५ | ३० |
| बांधकाम चालू असलेल्या सदनिका | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १ | २५७ए | विरार, बोळिंज | मध्यम उत्पन्न गट | २५ | ९९.८० | ६०.७३+२.०७ मोकळी बाल्कनी | ४०९३५२१ | १५३००/- | ० | २५ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २५ |
| २ | २६३ | विरार, बोळिंज | अल्प उत्पन्न गट | २४६५ | ६०.६४ | ३०.६८ | २२६४६९५ | १०३००/- | २७१ | १५० | ३७ | ३७ | ६२ | ६२ | ७४ | ४९ | १२३ | ४९ | ४९ | १२३ | ४९ | ४९ | १२३२ | ४९ | २४६५ |
| ३ | २६४ | विरार, बोळिंज | मध्यम उत्पन्न गट | १२६५ | ९९.८० | ६०.७३+२.०७ मोकळी बाल्कनी | ४०९३५२१ | १५३००/- | १३९ | ७६ | १९ | १९ | ३२ | ३२ | ३८ | २५ | ६३ | २५ | २५ | ६३ | २५ | २५ | ६३४ | २५ | १२६५ |
| ४ | २६५ | मीरा रोड बिल्डिंग नं. ई-८, ई-९ | अत्यल्प उत्पन्न गट | २८० | २८.५४ | २१.०० | १२१२४७८ | ५३००/- | ३१ | १७ | ४ | ४ | ७ | ७ | ८ | ५ | १४ | ५ | ६ | १४ | ६ | ६ | १४० | ६ | २८० |
| ५ | २६६ | कावेसर ठाणे | अल्प उत्पन्न गट | १६४ | ६२.६७ | ३४.८० | २३७७६०० | १०३००/- | १८ | १० | ३ | ३ | ४ | ४ | ५ | ३ | ८ | ३ | ३ | ८ | ३ | ३ | ८३ | ३ | १६४ |
| ६ | २६०ए | सिंधुदूर्ग | मध्यम उत्पन्न गट | २ | ७१.९६ | ४८.५१ | १८२६४५४ | १५३००/- | ० | १ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ७ | २६१ए | सिंधुदूर्ग | मध्यम उत्पन्न गट | ४ | ६६.७६ | ४५.०० | १६९४४७० | १५३००/- | ० | ३ | ० | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ४ |
| ८ | २६२ए | सिंधुदूर्ग | उच्च उत्पन्न गट | २ | १०५.४५ | ७३.४५ | २८००२०३ | २०३००/- | ० | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ |
| ९ | २६७ | सिंधुदूर्ग | मध्यम उत्पन्न गट | ४ | ७१.९६ | ४८.५१ | १८२६४५४ | १५३००/- | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ४ |
| १० | २६८ | सिंधुदूर्ग | मध्यम उत्पन्न गट | ११ | ६६.७६ | ४५.०० | १६९४४७० | १५३००/- | १ | १ | ० | ० | ० | ० | १ | ० | १ | ० | ० | १ | ० | ० | ६ | ० | ११ |
| ११ | २६९ | सिंधुदूर्ग | उच्च उत्पन्न गट | ४ | १०५.४५ | ७३.४५ | २८००२०३ | २०३००/- | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | २ | ० | ४ |
| एकूण | | | | ४२७५ | | | | | ४७५ | ३०५ | ६७ | ७० | १०६ | १०६ | १२६ | ८२ | २१० | ८२ | ८३ | २१० | ८३ | ८३ | २०९९ | ८८ | ४२७५ |

### पात्रतेचे निकष

१) अर्ज सादर करावयाच्या दिवशी अर्जदाराचे वय १८ वर्षा पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

२) अर्जदार किंवा त्याची पत्नी/पती किंवा त्यांची अज्ञान मुले यांच्या नावे मालकी तत्वावर, भाडे खरेदी पध्दतीवर अथवा नोंदणी कृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून अर्जदार ज्या महानगरपालिका / नगरपालिका हद्दीतील गृहनिर्माण योजनेमध्ये अर्ज करणार आहे., त्या महानगरपालिका / नगरपालिका हद्दीत म्हाडाने वितरीत केलेला किंवा खाजगीरित्या संपादित केलेला निवासी गाळा/निवासी भूखंड नसावा.

| योजना संकेत क्रमांक | महानगरपालिका / नगरपालिका |
|---|---|
| १३० डी, १३१ डी, १३२ ए, २६६ | ठाणे महानगरपालिका |
| २५४ बी, २६५ | मिरा भाईंदर महानगरपालिका |
| २६३, २६४, २५७ ए | वसई विरार शहर महानगरपालिका |
| २६७, २६८, २६० ए, २६१ ए, २६२ ए, २६९ | वेंगुर्ला नगरपरिषद |

३) जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून महाराष्ट्रातील मागील सलग २० वर्षांच्या कालावधीत महाराष्ट्र राज्याच्या कोणत्याही भागामध्ये, अर्जदाराने किमान १५ वर्षांचे वास्तव्याचे अलिकडच्या काळातील अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)/ रहिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. (केंद्रशासन कर्मचारी (CG), प्रवर्ग-आरक्षण वगळून)

४) अर्जदाराचे सरासरी मासिक कौटुंबिक उत्पन्न (२०१५-१६ वर्षाकरिता) (पती+पत्नी(मुळ वेतन + महागाई भत्ता + बोनस+शहर भत्ता) गटनिहाय पुढीलप्रमाणे आवश्यक राहील.) वरील उत्पन्नामध्ये घरभाडे भत्ता, प्रवास भत्ता, धुलाई भत्ता, वाहन भत्ता, वैद्यकीय भत्ता या सारखे विशिष्ट प्रतिपूर्तीसाठी देण्यात आलेल्या भत्त्यांचा समावेश असणार नाही.

| | |
|---|---|
| • अत्यल्प उत्पन्न गट - (EWS) रु. १६,०००/- पर्यंत | • अल्प उत्पन्न गट - (LIG) रु. १६,००१ ते ४०,०००/- पर्यंत |
| • मध्यम उत्पन्न गट - (MIG) रु. ४०,००१ ते ७०,०००/- पर्यंत | • उच्च उत्पन्न गट - (HIG) रु. ७०,००१/- आणि त्यापेक्षा जास्त |

५) अर्जदारास एका संकेतातील एकाच आरक्षण गटामध्ये एकापेक्षा जास्त अर्ज करता येणार नाहीत. तसेच एका पेक्षा जास्त उत्पन्न गटामध्ये अर्ज करता येणार नाहीत. असे आढळल्यास असे अर्ज सोडतीपूर्वी रद्द केले जातील.

६) **अर्ज सादर करताना अर्जदाराचे स्वतःचे नावे बँक बचत खाते क्रमांक असणे आवश्यक आहे. दुसऱ्याचे, एन.आर.आय., चालू खाते तसेच संयुक्त बँक खाते क्रमांक वापरता येणार नाही. या अटीचा भंग केल्यास असे अर्ज सोडतीपूर्वी रद्द करण्यात येतील.**

७) अर्जदाराचे स्वतःचे पॅनकार्ड असणे आवश्यक आहे. तसेच ताबा घेणेपूर्वी आधार कार्ड (UID) नंबर सादर करणे आवश्यक आहे. पातत्रेसाठीच्या इतर अटी व शर्तींचा उल्लेख तसेच आरक्षण गटाचे विवरण इ. माहिती माहितीपुस्तिकेत विस्तृतपणे स्पष्ट करण्यात आली आहे. सर्व अर्जदारांनी माहितीपुस्तिकेचा सखोल अभ्यास अर्ज भरण्यापूर्वी करावा. माहितीपुस्तिका व अर्ज म्हाडाच्या ऑनलाईन अर्ज भरण्याचे संकेतस्थळ https://lottery.mhada.gov.in वर उपलब्ध राहिल.

८) द नॅशनल ट्रस्ट फॉर द वेलफेअर फॉर पर्सनस विथ ऑटिस्म, सिरेब्रल पालसी, मेन्टल रिटार्डेशन अॅन्ड डिसॅबिलीटीज, अॅक्ट १९९९ मधील प्रकरण ६ मधील कलम १३ ते १७ मधील तरतुदींच्या अधिन राहुन गतीमंद (मेन्टल रिटायड) व मनोविकृत (मेंन्टल इलनेस) या प्रवर्गातील अर्जदारांच्या वतीने संबंधीत व्यक्ती/संस्था अर्ज करु शकतील व या स्वरूपाचे अपंगत्व असलेल्या व्यक्तीस सदनिकेचे वितरण करताना त्याचे वैयक्तिक उत्पन्न विचारात घेण्यात येईल.

९) प्रत्येक प्रवर्गाच्या पात्रतेसंबंधी तपशीलवार माहिती संकेतस्थळावर जारी केलेल्या ''माहिती पुस्तिकेत'' देण्यात आली आहे.

### ऑनलाईन अर्ज भरावयाची पध्दतः

**सोडत २०१६ साठी अर्ज भरण्याची पध्दत खालीलप्रमाणे आहे.**

**टप्पा क्र. १ः अर्जदाराची नोंदणी**

- अर्जदाराने प्रथम https://lottery.mhada.gov.in या संकेतस्थळावर भेट द्यावी.
- सर्व प्रथम अर्जदाराने स्वतःचे USER NAME नोंदणी करावे. हा USER NAME कायम लक्षात ठेवावा. अर्जदारांने नोंदणी करण्यासाठी खालील बाबीची माहिती तयार ठेवावी.
  १. स्वतःचे नाव, २. कौटुंबिक उत्पन्न, ३. अर्जदाराचे फोटो (स्कॅन केलेले स्वतःचे सुस्पष्ट पासपोर्ट आकारातील रंगीत व ठळक छायाचित्र असावे व ते ५० kb पर्यंत jpg format मध्ये असावे.) ४. पॅनकार्डचे तपशिल (पॅन क्रमांकाचे ऑनलाईन व्हेरिफिकिशेन केले जाईल.), ५. जन्मतारिख (पॅनकार्डप्रमाणे), ६. व्यवसाय, ७. वैवाहीक स्थिती, ८. आधारकार्ड क्रमांक, ९. लिंग, १०. रहाण्याचा पत्ता, ११. भ्रमणध्वनी क्रमांक (शून्यापासून सुरू करू नये.), १२. ई-मेल आडी **(टिपः सर्व कम्युनिकेशन हे ई-मेल व एसएमएस द्वारे करण्यात येणार असल्यामुळे ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक भरतांना काळजी घेणे आवश्यक आहे.)** १३. अर्जदाराचा बँक खात्याचा तपशिल, १३.१ बँकेचे आय.एफ.एस.सी. कोड किंवा बँकेचा एम.आय.सी.आर. क्रमांक

**टप्पा क्र. २ः सोडतीसाठी ऑनलाईन अर्ज भरणे**

- वरील टप्पा क्र. १ अनुसार नोंदणी केल्यानंतर नोंदीत अर्जदारास युजर नेम व पासवर्डचा वापर करुन लॉगइन करता येईल. नोंदणी करतांना दिलेल्या माहिती अनुसार अनुज्ञेय उत्पन्नगटानुसार अर्ज करता येईल.
- अर्जदाराने नोंदणी करतेवेळी दिलेली माहिती SUBMIT करेपर्यंत "EDIT" करता येईल तसेच ते पहातासुध्दा येईल.
- योजनेकरिता अर्ज करतांना "APPLY FOR LOTTERY" या लिंक वर क्लिक करावे. असे केल्यानंतर अर्जदाराास उत्पन्न गटा अनुसार अर्ज करावयाचे विविध योजना संकेत क्रमांकाची माहिती दिसेल.
- यानंतर अर्जदाराला "APPLICATION FOR RESIDENTIAL ACCOMODATION FORM" दिसेल. सदर फॉर्म भरतांना अर्जदारास योजना संकेत क्रमांक, प्रवर्ग, रक्कमेचा भरणा करण्याची पध्दत इत्यादी माहितीसह इतर माहिती भरावयाची आहे. **(टिपः नोंदणी फॉर्ममधील सर्व माहिती "RESIDENTIAL ACCOMODATION FORM" मध्ये आपोआप दिसेल.)**
- वरील सर्व माहिती भरल्यानंतर "SUBMIT" या बटनवर क्लिक करावे. बदल करावयाचे नसल्यास निश्चित "CONFIRM" या बटनवर क्लिक करावे. त्यानंतर तळाशी ''प्रिन्ट अक्नॉलेजमेंट इन इंग्लिश'' व ''प्रिन्ट अक्नॉलेजमेंट इन मराठी'' यापैकी अर्जदाराने योग्य पर्याय निवडून तेथे क्लिक केल्यास अर्जदाराने भरलेल्या अर्जाची एडिट न करता येणारी पीडीएफ (PDF) च्या स्वरूपात फाईल स्क्रिनवर दिसेल त्यावर १० अंकी अर्ज क्रमांक दिसेल. ही पीडीएफ (PDF) फाईल अर्जदार कुठेही सेव्ह करू शकतो व त्याची प्रिंटआऊट घेऊ शकतो.
- ज्या अर्जदारांना ऑन लाईन पेमेंट करावयाचे आहे अशा अर्जदारांनी अर्जाची प्रिंट घेतल्यानंतर अर्जदाराने ''MY APPLICATION'' मध्ये जाऊन पेमेंट करावे व ज्या अर्जदारांना डी.डी./पे ऑर्डर द्वारे पेमेंट करावयाचे आहे अशा अर्जदारांनी अर्जाची प्रिंट घेतल्यानंतर AXIS BANK मध्ये जाऊन डी.डी./पे ऑर्डर द्वारे पेमेंट करावे.

**टप्पा क्र. ३**

१) **अनामत रक्कम भरण्याची पद्धत** १.१ डी.डी./पे ऑर्डर द्वारे, १.२ डेबिट कार्ड/क्रेडिट कार्ड द्वारे १.३ इंटरनेट बँकिंगद्वारे

2) ऑनलाईन पेमेंट केल्यास सर्व्हिस प्रोव्हायडरने ठरविलेले शुल्क अर्जदारास अदा करावे लागेल. त्याची माहिती सॉफ्टवेअरमध्ये उपलब्ध आहे.

३) एकदा नोंदणी केल्यानंतर त्या अकाऊंटद्वारे अर्जदार एकापेक्षा जास्त प्रवर्ग/योजनेसाठी पात्र असल्यास त्याला एकापेक्षा जास्त अर्ज भरता येईल.

- संरक्षण/सीमा दलातील किंवा सीमा भागातील रस्तेबांधणी व विकास महामंडळाच्या ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती भारताच्या सीमा भागात झाली आहे अशा कर्मचाऱ्यांनी पेमेंट सुविधा डी.डी./पे ऑर्डर स्वरुपात स्विकारली असेल तर त्यांनी डी.डी./पे ऑर्डर हे मुंबई शाखेतून देय असलेला ''AXIS BANK ACCOUNT KHADB 2016'' या नावे काढलेला विहित रकमेचा डी.डी./ पे ऑर्डर अर्जासोबत जोडून इस्टेट मॅनेजर-।।/कोंकण बोर्ड, मेझनाईन फ्लोअर, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१ येथे दिनांक १०/०२/२०१६ पर्यंत पोहोचतील अशा रितीने पोस्टाने पाठवू शकतात. यानंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.
- ज्या अर्जदारांनी डी.डी./पे ऑर्डर हे पर्याय निवडलेले आहेत त्यांनी अर्जासोबत विहित केलेल्या अनामत रक्कम अधिक रु. ३००/- (अर्ज प्रोसेस फी विनापरतावा) अशा रकमेचा एकच राष्ट्रीयकृत/शेड्यूल्ड/खाजगी बँकेतून मुंबई शाखेतून देय असलेला मुंबई मंडळासाठी ''AXIS BANK ACCOUNT KHADB 2016'' या नावे काढलेला डी.डी./पे ऑर्डर जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या बँकेच्या शाखेत दिनांक १५/०१/२०१६ पासून ११/०२/२०१६ पर्यंत बँकेच्या कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत जमा करावा.
- दिनांक १५/०१/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपूर्वी व दिनांक ०९/०२/२०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेनंतर प्राप्त झालेले ऑनलाईन अर्ज सोडतीसाठी विचारात घेतले जाणार नाहीत. डी.डी./पी.ओ. मागे कृपया आपला अर्ज क्रमांक लिहावा.

४) ऑनलाईन पेमेंट करताना काही वेळेस तांत्रिक अडचणींमुळे अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास व पुन्हा 'दुबार' प्रयत्न करताना एक अर्जासाठी दोन वेळा अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा झाल्यास याबाबत त्वरीत मिळकत व्यवस्थापक-२/कोंकण मंडळ यांच्या, वर नमूद केलेल्या पत्यावर संपर्क करावा. अशा प्रकारे दुबार भरणा केलेल्या रक्कमेच्या परतावा सोडतीनंतर करण्यात येईल.

५) ऑनलाईन पेमेंट करताना काही तांत्रिक अडचणींमुळे अनामत रक्कम मंडळाच्या खात्यावर जमा न झाल्यास त्यास मंडळ जबाबदार राहणार नाही.

६) **अर्जामध्ये विचारलेली माहिती अर्जदाराने जाणूनबुजून चुकीची दिल्याचे अर्ज तपासणीमध्ये आढळल्यास असे अर्ज रद्द ठरविण्यात येतील.**

### विशेष सूचनाः

१) सदर योजनेतील वितरणांस, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, विक्री, हस्तांतरण व सदनिकांची अदलाबदल) विनियम १९८१ व (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ च्या तरतूदी जशाच्या तश्या **(वेळोवळी होणाऱ्या सुधारणांसह)** लागू राहतील.

२) नियोजीत प्रकल्पातील योजनांचे चटई क्षेत्रफळ, विक्री किंमत व सदनिकांची संख्या अंदाजित असून त्यामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३) **सदनिकांच्या वितरणासाठी कोणालाही म्हाडाने प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने कोणत्याही अशा व्यक्तीशी परस्पर व्यवहार करु नये. तसे केल्यास कोंकण मंडळ/म्हाडा कोणत्याही व्यवहारास/फसवणुकीस जबाबदार राहणार नाही.**

४) यशस्वी अर्जदार पात्र ठरल्यास अशा लाभार्थ्यांना महाराष्ट्र शासनाच्या नियमानूसार आवश्यक मुद्रांक शुल्क व नोंदणी शुल्क अदा करावे लागेल. तसेच लाभार्थ्यांनी विक्री किंमती व्यतिरिक्त सेवाकर (Service Tax) तसेच महाराष्ट्र मुल्यवर्धीत कर (M VAT) संबंधित शासकीय कार्यालयाकडे भरणा करणे आवश्यक आहे. मुद्रांक शुल्क व वरीलप्रमाणे लागू असणारे कर भरणा केल्यानंतरच सदनिकेचे प्रत्यक्ष वितरण करण्यात येईल.

५) वरील गृहनिर्माण योजनांसाठी पाणीपूरवठा व विद्युतपूरवठा त्या त्या संस्थांकडून उपलब्ध होत असतो, त्यांच्याकडून उशीर झाल्यास योजनेसाठी सदर सुविधा उशिरा उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

६) यशस्वी व पात्र अर्जदाराने सदनिकेच्या विक्री किंमतीपोटी भरावयाच्या टप्पानिहाय रकमेचा तपशिल माहितीपुस्तिकेमध्ये दर्शविण्यात आला आहे.

७) संगणकीय सोडतीत कोणत्याही प्रकारे मानवी हस्तक्षेप होऊ शकत नाही. याकरिता अर्जदारांना विनंती करण्यात येते की, अशा प्रकारच्या कोणत्याही प्रलोभनांना बळी पडू नये.

८) या योजनांतर्गत आलेला कोणताही अर्ज किंवा सर्व अर्ज कोणतेही कारण न देता नाकारण्याचा किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचा अधिकार मुख्य अधिकारी/कोंकण मंडळ यांनी राखून ठेवला आहे.

९) जाहिरात व सोडतीच्या अनुषंगाने काही नवीन सूचना असल्यास तसे **www.mhada.maharashtra.gov.in, www.mhada.gov.in** तसेच **https://lottery.mhada.gov.in** या संकेतस्थळांवर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील.

१०) अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती, भटक्या जमाती व विमुक्त जमातीच्या प्रवर्गातील लाभार्थींना जात पडताळणी प्रमाणपत्र सोडतीच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत सादर करणे आवश्यक आहे.

११) जे अर्जदार सोडतीमध्ये विजेते ठरतील ते वगळून, उर्वरित अर्जदारांनी भरलेली अनामत रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये सोडतीच्या दिनांकापासून १५ दिवसांत जमा केली जाईल.

१२) जाहिरातीमध्ये अनावधानाने झालेल्या छपाईच्या चुकांचा कोणत्याही प्रकारे अर्जदारास फायदा घेता येणार नाही.

**माहितीपुस्तिका व अर्जाचा नमुना दिनांक १२/०१/२०१६ पासून संकेतस्थळांवर उपलब्ध होईल.**

## अधिक माहितीसाठी संपर्कः

**'म्हाडा लॉटरी मदत केंद्र'**
**मित्र कार्यालयाशेजारी, गेट नं. ५ जवळ, गृहनिर्माण भवन,**
**वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.**
**लॉटरी सोडत दि. २४.०२.२०१६ रोजी सकाळी १०.०० वाजता**
**रंगशारदा सभागृह, वांद्रे (प.), मुंबई येथे आयोजित केली जाईल.**
**'म्हाडाचे अधिकृत संकेतस्थळ'**

**म्हाडाचे ऑनलाईन अर्जाकरिता संकेतस्थळ: https://lottery.mhada.gov.in**
**हेल्पलाईन नं.: ९८६९९८८०००, ०२२-२६५९२६९२/९३,**
**ई-मेल: kblottery@mhada.gov.in**

(कृ.मा.प. ...)

## ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर प्राप्त होणाऱ्या प्रिंटेड रिसिटची स्विकृती ॲक्सीस बँकेच्या खालील शाखांतून सोमवार ते शनिवार: वेळ सकाळी ९.३० ते दुपारी ३.३० पर्यंत.
## (दुसरा व चौथा शनिवार तसेच सार्वजनिक सुट्ट्यांचे दिवस वगळून)

| जिल्हा | शाखाचे नाव | शाखेचा पत्ता |
|---|---|---|
| मुंबई | अंधेरी (पूर्व) | कॉर्पोरेट सेंटर, तळमजला, सीटीएस नं. २७१, अंधेरी–कुर्ला रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००५९ |
| मुंबई | अंधेरी (पूर्व) | एमआयडीसी, तळमजला, अहुरा सेंटर, महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई ४०००९३. |
| मुंबई | अंधेरी (प.) | सांघी व्हीला, रेमंड शोरुमच्या बाजूला, एस.व्ही. रोड, अंधेरी (प.), मुंबई ४०००५८ |
| मुंबई | अंधेरी | शॉप नं. १ ते ४, न्यू सिध्दार्थ सीएचएसएल, सात बंगलो, ऑफ जे पी रोड, अंधेरी (प.), मुंबई ४०००५३ |
| मुंबई | वांद्रे | मंगल महाल, टर्नर रोड, वांद्रे (प.), मुंबई ४०००५० |
| मुंबई | वांद्रे | तळमजला, मुंबई एजुकेशन ट्रस्ट, लिलावती हॉस्पिटलसमोर, बांद्रा रिक्लेमेशन, वांद्रे (प.), मुंबई ४०००५० |
| मुंबई | भांडूप | आर आर रिॲल्टी, लाल बहादूर शास्त्री मार्ग, भांडूप (प.), मुंबई ४०००७८ |
| मुंबई | बांद्रा–कुर्ला कॉम्पलेक्स | फॉरच्यून २०००, तळमजला, बांद्रा–कुर्ला कॉम्पलेक्स, वांद्रे (पू.), मुंबई ४०००५१ |
| मुंबई | बोरीवली (पूर्व) | लता अपार्टमेंटस्, कुलुपवाडी, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, बोरीवली (पू.), मुंबई ४०००६६ |
| मुंबई | बोरीवली (पूर्व) | तळमजला, शॉप नं.१५, १६, १७ आणि १८, कंट्री पार्क को.हा.सो.लि., दत्तपाडा रोड, बोरीवली पूर्व, मुंबई ४०००६६ |
| मुंबई | बोरीवली (प.) | तळमजला व पहिला मजला, जलाराम बिझनेस सेंटर, चामुंडा सर्कलच्या समोर, गांजावाला लेन, बोरीवली (प.), मुंबई ४०००९२ |
| मुंबई | भायखळा | तळमजला, ३४०, वार्डन हाउस, सर जे. जे. रोड, भायखळा, मुंबई ४००००८ |
| मुंबई | चेंबुर | सोना प्लॉट नं. सी/२०, पहिला रोड, बीएमसी वार्ड ऑफिसच्या समोर, चेंबुर, मुंबई ४०००७१ |
| मुंबई | चौपाटी | तळमजला, पहिला व दुसरा मजला, सुमेर चेंबर्स, जंक्शन ऑफ पंडिता रमाबाई मार्ग, आणि के एम मुंशी मार्ग, चौपाटी, मुंबई ४००००७ |
| मुंबई | चर्चगेट | १२, मोती महल १९५, जमशेदजी टाटा रोड, चर्चगेट, मुंबई ४०००२० |
| मुंबई | कॉफर्ड मार्केट | शॉप नं. १, २ व ३, अशोक शॉपिंग सेंटर, लोकमान्य टिळक मार्ग, कॉफर्ड मार्केट, मुंबई–४००००१ |
| मुंबई | दादर | तळमजला व पहिला मजला, ए टू झेड शॉपिंग ब्रॉडवे, प्रिमायसेस को–ऑप. सोसायटी लि., डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोड, दादर–टीटी, **दादर (पू.)**, मुंबई–१४ |
| मुंबई | दादर | ८१, देव कुंज, वीर सावरकर मार्ग, शिवाजी पार्क, दादर, मुंबई ४०००२८ |
| मुंबई | दहीसर | 'बी' विंग, मधुबन, एल टी रोड, दहीसर (प.), मुंबई ४०००६८ |
| मुंबई | दहीसर (पूर्व) | शॉप नं. ६,७,८, मंगलम को–ऑप. हौसिंग सोसायटी लि., आनंद नगर, दहीसर (पूर्व), मुंबई ४०००६८ |
| मुंबई | दिंडोशी | ओंकार, प्लॉट नं. १७, शिवधाम संकुल, जनरल ए. के. वैद्य मार्ग, ओबेरॉय मॉलसमोर, दिंडोशी, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३ |
| मुंबई | घाटकोपर | साई हेरीटेज, टिळक रोड, बालाजी मंदिरच्या बाजूला, घाटकोपर (पू.), मुंबई ४०००७७ |
| मुंबई | गोरेगांव (पूर्व) | तळमजला, मनिष चेंबर्स कमर्शिअल कॉम्पलेक्स, सीटीएस नं. ८७/ए, सोनावाला रोड, गोरेगाव (पू.), मुंबई ४०००६३ |
| मुंबई | गोरेगांव (पश्चिम) | तळमजला व पहिला मजला, पाटकर कॉलेज, एस. व्ही. रोड, गोरेगाव (प.), मुंबई ४०००६२ |
| मुंबई | गोरेगांव लिंक रोड | तळ मजला, दुकान क्र. ५, ६, ७, लिंक हाऊस, लिंक रोड, मालाड (प.), मुंबई–६४ |
| मुंबई | जे पी रोड | तळमजला, प्लॉट नं. १०७, राजेश बिल्डिंग, जे. पी. रोड, अंधेरी (प.), मुंबई ४०००५८ |
| मुंबई | कलिना | ''हरभजन'', सी.एस.टी. रोड, मुंबई–४०००९८ |
| मुंबई | कांदिवली | ऐवरशाईन मिलिनियम पॅराडाईज, ठाकूर व्हिलेज, कांदिवली (पूर्व), मुंबई ४००१०१ |
| मुंबई | कांदिवली (प) | शॉप नं. ८–१२, राज आर्केड सीएचएस लिमिटेड, महावीर नगर, कांदिवली (प.), मुंबई ४०००६७ |
| मुंबई | खार | मातृ–स्मृती, प्लॉट नं. ३२६, मेन लिकिंग रोड, खार (प.), मुंबई ४०००५२ |
| मुंबई | लॅमिंगटन रोड | तळमजला, अप्सरा मल्टीप्लेक्स, डॉ.बी.डी. मार्ग, लॅमिंग्टन रोड, ग्रॅंट रोड (पूर्व), मुंबई ४००००७ |
| मुंबई | मुलुंड | मुलुंड, नं.१, कमर्शिअल विंग, विकास पॅराडाईस, एलबीएस मार्ग, मुलुंड (पश्चिम), मुंबई ४०००८० |
| मुंबई | माहिम | फरिदाबाद मेंशन, तळमजला, ५५सी, लेडी जमशेदजी रोड, माहिम (पश्चिम), मुंबई ४०००१६ |
| मुंबई | मालाड (पूर्व) | शॉप नं. १,२,३ व ६, श्री वल्लभ दर्शन बिल्डिंग, पोद्दार रोड, मालाड (पू.), मुंबई ४०००९७ |
| मुंबई | मालाड (पूर्व) | श्री कृष्णा को.हा.सो., अप्पर गोविंद नगर, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७ |
| मुंबई | मालाड (प.) | सोनीमूर अपार्टमेंट, टिम्बर इस्टेट, एस. व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ |
| मुंबई | मालाड (प.) | ब्यूमोंडे को.ऑ. हाऊसिंग सोसायटी, सुंदर नगर, प्लॉट नं.१, एस.व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ |
| मुंबई | माझगांव | प्रभात अपार्टमेंट, गनपॉवर आणि सरदार बळवंतसिंग धोंडी मार्ग, माझगांव, मुंबई ४०००१० |
| मुंबई | अंधेरी | अहुरा सेंटर, तळमजला, २८, महाकाली गुंफा रोड, अंधेरी (पू.), मुंबई ४०००९३ |
| ठाणे | मिरा रोड | ई–४१, पूनम चेंबर्स, टप्पा ३, सेक्टर क्र. ६७ समोर, शांती पार्क, मिरा रोड (पू.), जि. ठाणे ४०११०७ |

| जिल्हा | शाखाचे नाव | शाखेचा पत्ता |
|---|---|---|
| मुंबई | मुलुंड | कोनार्क दर्शन, प्लॉट नं ५३, न्यू सर्वे, नं. १००० (पार्ट), सीटीएस नं. ११९५, झवेर रोड, जैन मंदिराच्या पुढे, मुलुंड (प.), मुंबई ४०००८० |
| मुंबई | नरिमन पॉईंट | तळ मजला, जी–१, मेकर चेंबर–०४, जमनालाल बजाज मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई ४०००२१ |
| मुंबई | मरिन लाईन्स | तळ मजला, हरचंद्रायी हाऊस, ८१ क्वीन्स रोड, एम. के. मार्ग, मरिनलाईन, मुंबई ४००००२ |
| मुंबई | ओशिवरा | तळमजला, फलॅट नं. ००१ आणि ००२, म्हाडा कॉम्प्लेक्स, मारीगोल्ड अपार्टमेंट, न्यू लिंक रोड, ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई ४०००५३ |
| मुंबई | परळ | तळमजला, सेंटर पॉईन्ट, बाबासाहेब आंबेडकर मार्ग, परळ, मुंबई ४०००१२ |
| मुंबई | पवई | जी १७ व १८, व्हेंच्यूरा बिल्डिंग, हिरानंदानी बिझनेस पार्क, पवई, मुंबई ४०००७६ |
| मुंबई | साकीनाका | हाईड पार्क, तळमजला, युनिट नं.४, अन्सा इंडस्ट्रीयल इस्टेटच्या समोर, साकी विहार रोड, अंधेरी (पूर्व), मुंबई – ४०० ०७२ |
| मुंबई | सायन | विजय सदन, प्लॉट नं. ७, सी.एस.टी. नं. २८२/६, कॉर्नर रोड नं. २४ वे २५, सायन (पू.), मुंबई ४०००२२ |
| मुंबई | ताडदेव | तळमजला, फेमस लाईन लॅबोरेटिज, १५६ पंडित एमएम मालविया रोड, ताडदेव, मुंबई ४०००३४ |
| मुंबई | टिळक नगर, चेंबुर | स्वास्तिक व्हॅल्यू हाईट, प्लॉट नं. एन.डी.आर. २३, टिळक नगर, चेंबूर (पूर्व), मुंबई ४०००७१ |
| मुंबई | मालाड (पूर्व) | श्री कृष्णा को.हा.सो., अप्पर गोविंद नगर, मालाड (पूर्व), मुंबई ४०० ०९७ |
| मुंबई | मालाड (प.) | ब्यूमोंडे को.ऑ. हाऊसिंग सोसायटी, सुंदर नगर, प्लॉट नं.१, एस.व्ही. रोड, मालाड (पश्चिम), मुंबई ४०००६४ |
| मुंबई | वाकोला | सीटी सर्व्हे नं. ८४१ ते ८४६, ''फ्लोरेंस'', फ्लोरेंस को.हा.सो. लि., वाकोला, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई – ४०००५५ |
| मुंबई | विले पार्ले (पू) | मातृ आर्केड, तळमजला, प्लॉट नं. ३२, सुभाष रोड, विले पार्ले (पू), मुंबई ४०००५७ |
| मुंबई | विले पार्ले (पश्चिम) | तळमजला व पहिला मजला, सेनोरीटा, प्लॉट नं. २१, गुलमोहर रोड, जुहू सर्कलजवळ, विलेपार्ले (प.), मुंबई ४०००४९ |
| मुंबई | वरळी | तळमजला, अमन चेंबर्स, न्यू पासपोर्ट ऑफिसच्या समोर, वीर सावरकर मार्ग, वरळी, प्रभादेवी, मुंबई ४०००२५ |
| मुंबई | वरळी नाका | ८७, अतुर हाऊस, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी नाका, मुंबई ४०००२८ |
| नवी मुंबई | सीबीडी बेलापूर | तळमजला, ''इलोरा'' कमर्शिअल, युनिट १–४, प्लॉट नं. २७, सेक्टर–११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, जि. ठाणे ४००६१४ |
| नवी मुंबई | कामोठे | तळ आणि पहिला मजला, साई प्रसाद आर्केड, प्लॉट नं.२, सेक्टर ७, कामोठे, नवी मुंबई, जि. रायगड ४१०२०६ |
| नवी मुंबई | खारघर | तळमजला, ''अनंत'', प्लॉट नं. ३१, सेक्टर ४, खारघर, नवी मुंबई ४१०२१० |
| नवी मुंबई | कोपरखैराणे | प्लॉट नं. १८, सेक्टर १४, वाशी–कोपरखैराणे, मेन रोड, कोपरखैराणे, नवी मुंबई–४००७०९ |
| नवी मुंबई | नेरूळ | तळमजला, शांती वैभव सीएचएस, प्लाट नं. ११ए, सेक्टर ४२ए, नेरुळ, नवी मुंबई ४०००७६ |
| नवी मुंबई | सानपाडा | शॉप नं. २१, २२ व २३, मोराज रेसिडेन्सी, प्लॉट नं. १, सेक्टर १६. पाम बीच रोड, सानपाडा (पू.), नवी मुंबई, जि. ठाणे ४००७०५ |
| नवी मुंबई | तुर्भे | एव्हरेस्ट इन्फोटेक पार्क, तळमजला, प्लॉट नं. डी–३, टीटीसी, इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी तुर्भे, नवी मुंबई–४००७०५ |
| नवी मुंबई | वाशी | नंबर १, १ए, १०१ आणि १०१ए, वर्धमान चेंबर्स प्रिमासेस, सीएसएल, प्लॉट नं. ८४, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई ४००७०५ |
| ठाणे | अंबरनाथ | तळमजला, स्वानंद शॉपिंग सेंटर, शिवाजी चौक, अंबरनाथ स्टेशनजवळ, जिल्हा ठाणे, अंबरनाथ (पूर्व) ४२१५०१. |
| ठाणे | बदलापूर | ''भास्करा'', सर्व्हे नं. २० व २६, योग–वैभव कॉ–ऑप. हौसिंग सोसायटी, कत्रप रोड, बदलापूर, ठाणे ४२१५०३ |
| ठाणे | भाईंदर | मेरी हिला, स्टेशन रोड, क्रॉस गार्डन समोर, भार्यंदर (पश्चिम), जि. ठाणे ४०११०१ |
| ठाणे | भिवंडी | हॉटेल अशोक, भिवंडी कल्याण रोड, भिवंडी, जि. ठाणे ४२१३०२ |
| ठाणे | डोंबिवली | तळमजला, लिखिते हाऊस, सुभाष नगर, क्रॉस फडके रोड, डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे ४२१२०१ |
| ठाणे | मिरा भाईंदर | तळमजला, शॉप नं. १६,१७ व ००५, श्री वक्रतुंड सीएचएस लि., सर्वोदय नगर, जुने सोनेरीच्या पुढे, बालाजी हॉस्पिटल समारे, मीरा रोड (पूर्व), ठाणे ४०११०७ |
| ठाणे | मिरा रोड | तळमजला, पूनम रेसिडेसि, पंजाब नेशनल बँक जवळ, शांती पार्क, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे ४०११०७ |
| ठाणे | कल्याण (पश्चिम) | जुने सूचक निवास, सीटीसी नं. ३२०३, मुरबाड रोड, कल्याण (पश्चिम), जि. ठाणे ४२१३०१ |
| ठाणे | ठाणे | मोहन थ्री व्हिलर लि. शोरुम, धिरज बाग, एलबीएस मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम), ४००६०२ |
| ठाणे | ठाणे | तळमजला, शॉप नं. १,२ व ३, ''पटास्कर इक्लाट'', मुचरा पॉलिटेकनिक कॉलेजजवळ, आनंद नगर, घोडबंदर रोड, ठाणे (प.), ४०००६०७ |
| ठाणे | ठाणे | सर्व्हे नं. १६६/१ ए, पी. टी. चितालसर, मानपाडा, ठाणे (पश्चिम), ४००६०७ |
| ठाणे | उल्हासनगर | तळमजला, हॉटेल इगल बिल्डिंग, फर्निचर बाजार, सपना गार्डनजवळ, उल्हासनगर, जिल्हा ठाणे ४२१००३ |
| ठाणे | उथळसर | जॉर्ज मेंशन, एलबीएस मार्ग, उथळसर नाका, ठाणे (पश्चिम), ४००६०१ |
| पालघर | बोईसर | तळमजला, शॉप नं.–३३/३४/३५ व ६४/६५/६६, अरिहंत मार्केट, सेंट्रल एम्पायर, बोईसर, ता. पालघर, जि. ठाणे ४०१५०१ |

| जिल्हा | शाखाचे नाव | शाखेचा पत्ता |
|---|---|---|
| पालघर | पालघर | तळमजला, सत्यम कमर्शियल कॉम्प्लेक्स, कचेरी रोड, पालघर ४०१४०४ |
| पालघर | वसई | तळमजला, जानकी टॉकिज कंपाउड, पारनाका, वसई (पश्चिम), गाव दोवली, जि. ठाणे ४०१२०१ |
| पालघर | वसई | धुरी सेंटर, पंचवटी हॉटेलच्या समोर, अंबाडी रोड, वसई (प.), ठाणे ४०१२०२ |
| पालघर | विरार | युनिट नं. ५–७, विवा गोकुळ आर्केड, विवा गोकुळ टॉउनशिप, आगाशी रोड, विरार (पश्चिम), जि. ठाणे ४०१३०३ |
| पालघर | विरार (पूर्व) | तळमजला विद्या–सदन, मिराबाई पाटिल मार्ग समोर, मनवेल पाडा रोड, विरार (पूर्व) ४०१३०५ |
| रायगड | अलिबाग | स्वाती बिल्डिंग, तळमजला, कॉंग्रेस भवन समोर, महर्षी कर्वे रोड, अलिबाग, जि. रायगड ४०२२०१ |
| नवी मुंबई | पनवेल | राजे कॉम्प्लेक्स, प्लाट नं. १९८ ए, शिवाजी चौक, पनवेल ४१०२०६ |
| रायगड | पेण | तळमजला, सेंटर पॉईंट, चिंचपाडा, पेण, जिल्हा रायगड ४०२१०७ |
| अमरावती | अमरावती | तळमजला, गुलशन टॉवर, मोफुस्सील प्लॉटस्, पंचशील टॉकीज जवळ, एनएच नं. ६, जयस्तंभ चौक जवळ, अमरावती ४४४६०१. |
| औरंगाबाद | औरंगाबाद | साकार इमारत, अदालत रोड, क्रांती चौक जवळ, औरंगाबाद ४३१००१. |
| बीड | बीड | वैद्यनाथ, शिवाजी चौक, पोलिस अधिक्षक कार्यालयासमोर, बीड ४३११२२ |
| भंडारा | भंडारा | तळमजला आणि पहिला मजला, प्लॉट नं. ८४, शास्त्री वॉर्ड, भंडारा मेन मार्केट रोड, भंडारा ४४१९०४. |
| चंद्रपूर | चंद्रपूर | प्लॉट नं. २२ बी, सिवील लाईन, चंद्रपूर–नागपूर हायवे, डीसीसी च्या पुढे, चंद्रपूर ४४२४०२. |
| धुळे | धुळे | तळमजला, लेन नं. २, मेन मार्केट, लालबाग, धुळे ४२४००१ |
| गडचिरोली | गडचिरोली | तळमजला, सावकार कॉम्प्लेक्स, धानोरा रोड, हॉटेल वैभव जवळ, जि. गडचिरोली ४४२६०५ |
| गोंदिया | गोंदिया | प्लॉट नं. ८६, ललानी मेंशन, मेन रोड, गोंदिया–४४१६०१ |
| हिंगोली | हिंगोली | तळमजला, सी.टी.एस. क्र. ३९६५, नगर परिषदेजवळ, हिंगोली हाऊस क्र. ८–२३१, साई संस्कार टॉवर, पोस्ट ऑफिस रोड, हिंगोली ४३१५१३ |
| जळगाव | जळगांव | पटेल प्लाझा, सी एस नं. २६८३, ए१/१७, एम जी रोड, जळगांव ४२५००१ |
| जालना | जालना | हेड पोस्ट ऑफिस रोड, जालना ४३१२०३. |
| कोल्हापूर | कोल्हापूर | नामदेव नेस्ट, तळमजला, प्लॉट नं. ११६०, साईक्स एक्सटेंशन, राजाराम रोड, कोल्हापूर–४१६००१ |
| लातुर | लातूर | सबदे टॉवर, सीटीएस नं. ९९०६, औसा रोड, लातूर–४१३५३१. |
| नागपूर | नागपूर | एम. जी. हाऊस, रविंद्रनाथ टागोर रोड, बोर्ड ऑफिसच्या बाजूला, सिवील लाईन्स, नागपूर–४४०००१. |
| नांदेड | नांदेड | निखील हाईट्स, वजीराबाद – बस स्टॅन्ड रोड, नांदेड ४३१६०१. |
| नंदुरबार | नंदुरबार | सीटीएस नं. ५१४ व ५७०, परदेशी पुरा, नगर परिषद ऑफिसजवळ, नंदुरबार–४२५४१२. |
| नाशिक | नाशिक | माझदा टॉवर, त्र्यंबक नाका, एफ.पी. नं. १८३, सीटीएस नं. ६२०/९, जीपीओ रोड, नाशिक ४०२००१ |
| उस्मानाबाद | उस्मानाबाद | तळमजला व पहिला मजला, किंग्ज कॉर्नर, शिवाजी चौक, उस्मानाबाद ४१३५०१ |
| परभणी | परभणी | तळमजला, कान्हेकर संकुल, प्लॉट नं. ७, एकता कॉलनी, बसमत रोड, परभणी ४३१४०१ |
| पुणे | पिंपरी चिंचवड | सर्वे नं. १८६, स्टेशन रोड, रामकृष्ण मोरे सभागृहासमोर, टाटा मोटर गेटजवळ, चिंचवड, पुणे ४११०३३. |
| पुणे | पुणे | एक्सिस बँक, स्टेरलिंग प्लाझा, १२६२/बी, जे.एम. रोड, डेक्कन जिमखाना, पुणे ४११००४. |
| पुणे | पुणे | एक्सिस बँक, एस.बी. रोड, भागिरथ बिल्डिंग, गोखले नगर, पुणे ४११०१६. |
| रत्नागिरी | रत्नागिरी | तळमजला, हॉटेल विहार डिलक्स, माळ नाका, एम डी नाईक रोड, रत्नागिरी ४१५६१२. |
| सांगली | सांगली | तळमजला, डीएसपी प्लाझा, सीटी सर्वे नं. ३२/ए, अंबराई रोड, आझाद चौक, कलेक्टर बंगल्याच्या समोर, सांगली ४१६४१६. |
| सातारा | सातारा | सर्वे नं. २५७, प्लॉट नं. २, अबांजनी, भोसले मळा, जी डी तापसे मार्ग, सातारा ४१५००१. |
| सिंधुदुर्ग | कुडाळ | मित्र कॉम्प्लेक्स, गाळा नं. ९०९१२, पोलिस स्टेशन जवळ, कुडाळ वेंगुर्ला रोड, कुडाळ, जि. सिंधुदुर्ग ४१६५२० |
| सोलापूर | सोलापूर | तळमजला, कनाले कल्याण मंडप, ड्युफरिंग चौक, रेल्वे लाईन, सोलापूर ४१३००१ |
| वर्धा | वर्धा | तळमजला व पहिला मजला, प्लॉट नं. २५६० ते २५६२, इंदिरा मार्केट रोड, वर्धा–४४२००१. |
| वाशिम | वाशीम | शॉप नं. २४ ते २८, पारस प्लाझा, सर्वे नं. ३२०/१, रीसोद रोड, वाशीम, तालुका व वाशीम ४४४५०५ |
| यवतमाळ | यवतमाळ | तळमजला, नगर परिषद कमर्शियल कॉम्प्लेक्स, आझाद मैदान रोड, यवतमाळ ४४५००१ |

**स्वाक्षरी/–**
(विजय लहाने)
मुख्य अधिकारी
कोंकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ,
(म्हाडाचा प्रादेशिक घटक)